# <u>नोटीस</u>

नगर विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक : जानेवारी २०१०.

<u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४</u>

क्रमांक एमआरडी-३३०९/७९१/सी आर-७३/नवि-७ :- **<u>सर्व संबंधिताना असे सूचित करण्यात येते की,</u>** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनिमय,१९७४ (१९७५ चा महा.४) याच्या कलम ३२,पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर छन्नमार्गावर,सामुदायिक शीघ प्रवास पध्दतीची अंमलबजावणी (Mass Rapid Transit system) करण्याच्या अनुरोधाने प्रस्तावित मेट्रो रेल्वेचे बांधकाम करण्याच्या प्रयोजनासाठी,विवक्षित जमिनीचे त्यावरील बांधकामासह संपादन करण्यासाठी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे, त्या अधिसूचनेचा मसुदा यासोबत जोडला आहे.

२. उक्त जमिनीच्या मालकाने किंवा इतर हिसंबंधित व्यक्तींनी,उक्त जमिनीचे संपादन का करण्यात येवू नये याबाबतची लेखी कारणे, ही नोटीस, **<u>महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात</u>** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, शासनाने प्रधान सचिव ,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांच्याकडे सादर करण्याचे,याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

३. या नोटीशीला अनुसरुन दाखविलेली अशी कोणतीही कारणे,उक्त कालावधीच्या आत प्राप्त झाली तर शासन ती विचारात घेईल.

# <u>अधिसूचनेचा मसुदा</u>

नगरविकास विभाग,

मंत्रालय,मुंबई-४०००३२,

दिनांक : जानेवारी २०१०.

<u>क्रमांक एमआरडी-३३०९/७९१/सीआर-७३/नवि-७</u>:- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने,नगर विकास विभाग क्रमांक एमयुटी- १००४/१६७१/सीआर.१५८/२००४ नवि-१० दिनांक १९ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयान्वये, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ (१९७५ चा महा.४) याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त प्राधिकरण " असा करण्यात आला आहे.) वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर छन्नमार्गावर मेट्रो रेल्वेच्या रुपात सामुदायिक शीघ्र प्रवास पध्दतीची अंमलंबजावणी करण्यासाठी, मध्यवर्ती अभिकरण म्हणून नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी,उक्त प्राधिकरणाच्या निवेदनावरुन राज्य शासनााला असे दिसून आले आहे की, वर्सोवा-अधेरी-घाटकोपर छन्नमार्गावर सामुदायिक शीघ्र प्रवास पध्दतीची अंमलबजावणी करण्याच्या अनुरोधाने प्रस्तावित मेट्रो रेल्वेचे बांधकाम करण्यासाठी,यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली विवक्षित जमीन त्यावरील बांधकामासह संपादीत करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा.४ ) याच्या कलम ३२, पोटकलम (१) मधील परंतुकान्वये आवश्यक असल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात ———रोजी नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि उक्त नोटीस उक्त जमिनीचा मालक आणि इतर हितसंबंधित व्यक्ती यांच्यावर रीतसर बजावण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी,उक्त नोटीशीस अनुसरुन उक्त जमीन मालकाने किंवा इतर कोणत्याही हिसंबधित व्यक्तीने दाखविलेली कारणे विचारात घेवून, महाराष्ट्र शासनाने, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन, त्यावरील बांधकामासह संपादित करण्याचे ठरविले आहे;

त्याअर्थी,आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३२,पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन, याद्वारे या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन,त्यावरील बांधकामासह संपादित करीत आहे.

<u>अनुसुची</u>

| **गावाचे किंवा प्रभागाचे नाव** | **सीटीएस क्रमांक** | **एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.)** | **संपादित करावयाचे प्रस्तावित असलेले क्षेत्र (चौ.मी.)** |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| घाटकोपर गाव,तालुका-कुर्ला मुंबई उपनगर जिल्हा. | १८११ (भाग) | १७८००.९ | १९३.० |
| | १९५८ (भाग) | ३७३३.६ | ४६५.० (बांधकासह) |

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या
आदेशानुसार व नावाने,

(सुरेश काकाणी)
शासनाचे उपसचिव

# <u>नोटीस</u>

नगर विकास विभाग

मंत्रालय,मुंबई-४०००३२

दिनांक    जानेवारी २०१०

<u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४.</u>

क्रमांक एमआरडी-३३०९/७९०/सी आर-७४/नवि-७ :- **<u>सर्व संबंधितांना असे सूचित करण्यात येते की,</u>** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनिमय,१९७४ (१९७५ चा महा.४) याच्या कलम ३२,पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मुंबई उपनगर जिल्हयातील सांताक्रूझ, तालुका अंधेरी येथील मिलन उपमार्ग (सब-वे) येथे, रेल्वे ओलांडणी पुलाचे बांधकाम करण्याच्या प्रयोजनासाठी विवक्षित जमिनीचे त्यावरील बांधकामासह संपादन करण्यासाठी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे. त्या अधिसूचनेचा मसुदा यासोबत जोडला आहे.

२. उक्त जमिनीच्या मालकाने किंवा इतर हितसंबंधित व्यक्तींनी, उक्त जमिनीचे संपादन का करण्यात येवू नये. याबाबतची लेखी कारणे, ही नोटीस, **<u>महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात</u>** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, शासनाचे प्रधान सचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय ,मुंबई-४०००३२ यांच्याकडे सादर करण्याचे याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

३. या नोटीशीला अनुसरुन दाखविलेली अशी कोणतीही कारणे,उक्त कालावधीच्या आत प्राप्त झाली तर, शासन ती विचारात घेईल.

# <u>अधिसूचनेचा मुसदा</u>

नगर विकास विभाग
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक जानेवारी २०१०

<u>क्रमांक एमआरडी-३३०९/७९०/सी आर-७४/नवि-७</u> :- ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ (१९७५ चा महा.४) याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त प्राधिकरण"असा करण्यात आला आहे.) निवेदनावरुन राज्य शासनाला असे दिसून आले आहे की, मुंबई उपनगर जिल्हयातील विलेपार्ले गावातील सांताकुझ,तालुका अंधेरी येथील मिलन उपमार्ग (सब -वे) येथील रेल्वे ओलांडणी पुलाचे बांधकाम करण्यासाठी यासोबत जोडलेल्या अनुसुचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली विवक्षित जमीन त्यावरील बांधकामासह संपादित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा.४) याच्या कलम ३२, पोटकलम (१) मधील परंतुकान्वये आवश्यक असल्याप्रमाणे,महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात ————— रोजी नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि उक्त नोटीस उक्त जमिनीचा मालक आणि इतर हितसंबंधित व्यक्ती यांच्यावर रीतसर बजावण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी,उक्त नोटीशीस अनुसरुन उक्त जमीन मालकाने किंवा इतर कोणत्याही हिसंबंधित व्यक्तीने दाखविलेली कारणे विचारात घेवून,महाराष्ट्र शासनाने, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन, त्यावरील बांधकामासह संपादित करण्याचे ठरविले आहे;

त्याअर्थी,आता उक्त अधिनियमाच्या कलम ३२,पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन,त्यावरील बांधकामासह संपादित करीत आहे.

अनुसुची

| गावाचे किंवा प्रभागाचे नाव | सीटीएस. क्रमांक | एकूण क्षेत्रफळ (चौ.मी) | संपादित करावयाचे प्रस्तावित असलेले क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| गाव-विलेपार्ले,तालुका-अंधेरी , मुंबई उपनगर जिल्हा | १६०० | ५५१.०० | ४४५.५ |
| | १५९९\अ | २२१७.८० | ७१.७ (बांधकामासह) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या

आदेशानुसार व नावाने,

(सुरेश काकाणी)

शासनाचे उपसचिव